नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - २२६ Issue - 226 | वार सोमवार दि. ५ जानेवारी २०२६ Blow- Monday Date 5 January 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# पुण्यात अन्न व औषध प्रशासनाची मोठी कारवाई

## राज्यात व राज्याच्या सीमेवरही मोठी कारवाई; ३२ कोटींचा प्रतिबंधित हुक्का साठा जप्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री नरहरी झिरवाळ यांनी राज्यात प्रतिबंधित वस्तूंवर कारवाईसाठी कठोर आदेश दिल्यानंतर आणि त्याची काटेकोर अंमलबजावणी होत आहे की नाही याचा आढावा घेतला जात असल्याने अन्न व औषध प्रशासन विभागाने राज्यभर प्रतिबंधित वस्तूंच्या उत्पादना विरोधात कारवाईचा बडगा उगारला आहे. याच कारवाई अंतर्गत पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील टाकवे येथील 'मे. सोएक्स इंडिया प्रा. ली.' या कंपनीवर छापा टाकून अन्न व औषध प्रशासनाने तब्बल ३१ कोटी ६७ लाख २१ हजार ९८७ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी कंपनीचे संचालक आणि व्यवस्थापकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अन्न सुरक्षा अधिकारी श्रीमती अस्मिता टोणपे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, ही कारवाई २ जानेवारी २०२६ रोजी करण्यात आली. यापूर्वी १ डिसेंबर २०२५ रोजी या कंपनीच्या उत्पादनांचे नमुने तपासणीसाठी घेण्यात आले होते. मुंबईतील अन्न विश्लेषकांच्या अहवालानुसार, या नमुन्यांमध्ये 'निकोटिन' पॉझिटिव्ह आढळले. हे उत्पादन मानवी आरोग्यास घातक असून महाराष्ट्र सरकारने १६ जुलै २०२५ रोजी काढलेल्या प्रतिबंधात्मक आदेशाचे उल्लंघन करणारे असल्याचे स्पष्ट झाले.

एकूण किंमत ३१ कोटी ६७ लाख,२१,९८७ रुपये (३१.६७ कोटी)रुपयांचे विविध फ्लेवर्सचे तयार हुक्का प्रॉडक्ट्स, कच्चे पदार्थ आणि फ्लेवर्सचा साठा जप्त करून कंपनीच्या दारांना सील ठोकले आहे.

अनिल कुमार चौहान (असिस्टंट मॅनेजर), असिफ फाजलानी (संचालक), फैजल फाजलानी (संचालक), मे. सोएक्स इंडिया प्रा. ली. (कंपनी) या व्यक्तींविरुद्ध पोलिसांनी गुन्हा नोंदवला आहे.

आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३(५), १२३, २२३, २७४, २७५ आणि अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ च्या विविध कलमांनुसार (कलम ३०, २६, २७, ५९) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ठाणे जिल्ह्यातील भिवंडी येथे ३१ डिसेंबर रोजी झालेल्या १९.४५ कोटींच्या कारवाईचा धागा पकडून पुणे एफडीएने ही मोठी साखळी उद्ध्वस्त केली आहे. या कारवाईमुळे प्रतिबंधित सुगंधित तंबाखू आणि हुक्का माफियांचे धाबे दणाणले आहेत.





पोलीस निरीक्षक अभिजित सुभाष देशमुख या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत. जळगाव जामोद महाराष्ट्र-मध्यप्रदेश सीमेवरील सातपुडा पर्वताच्या पायथ्याशी असलेल्या वनविभागाच्या तपासणी नाक्यावर वनविभागाने सप्तर्कतेने मोठी कारवाई करत मध्यप्रदेशातून महाराष्ट्रात अवैधरित्या आणला जाणारा तब्बल ७५ लाख रुपये, किमतीचा विमल गुटखा व पान मसाला जप्त केला. महाराष्ट्र शासनाने मानवी आरोग्यास घातक ठरणाऱ्या सुगंधी तंबाखू आणि हुक्क्यावर बंदी घातली असतानाही, त्याचा मोठा साठा दडवून ठेवणाऱ्या 'मे. हायस्ट्रीट इम्पेक्स एलएलपी' या गोदामावर अन्न व औषध प्रशासनाने ३० डिसेंबर २०२५ रोजी छापा टाकला आहे. भिवंडीतील दापोडे परिसरातून तब्बल १९ कोटी ४५ लाख ७६ हजार ३२० रुपये किमतीचा प्रतिबंधित हुक्का साठा जप्त करण्यात आला आहे. १ डिसेंबर रोजी घेण्यात आलेल्या 'अफजल' ब्रँडच्या हुक्का नमुन्यांच्या तपासणी अहवालात निकोटिनचे प्रमाण आढळल्याने ही कारवाई करण्यात आली. हा पदार्थ मानवी सेवनासाठी अपायकारक असल्याचे अन्न विश्लेषकांनी घोषित केले होते.

राज्यात बंदी असलेल्या सुंगधित तंबाखू आणि हुक्का उत्पादन करत कायद्याचे कोणी उल्लंघन करताना आढळल्यास त्याच्यावर अशाच प्रकारे कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिला आहे.

## आपली निवडणूक व्यवस्था संकटात, पैशाची ताकद आणि राजकीय दबावावर निकाल ठरतोय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : मनपा निवडणुकीमध्ये चांदा ते बांदा भाजप, शिंदे गट आणि मागून अजित पवार गटाची बिनविरोध उमेदवार निवडून आणण्यासाठी स्पर्धाच लागली. मात्र ही स्पर्धा अघोरी पद्धतीचा असल्याचा आरोप विरोधकांकडून करण्यात आला. इतकेच नव्हे तर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांचा धमकी देणारा व्हिडिओ सुद्धा शिवसेना खासदार संजय राऊत यांनी सोशल मीडियामध्ये व्हायरल केला. यामध्ये ते माजी खासदार हरिभाऊ राठोड यांना थेट सुरक्षा काढून टाकण्यासाठी धमकी देत असल्याचे दिसून आले. दुसरीकडे मनसे आणि शिवसेना ठाकरे गटाकडूनही उमेदवारांना धमकावण्यात आल्याचा आरोप करण्यात आला. एकेका उमेदवारांनी दिलेला आकड पाहता डोळ्याचे बुबुळ बाहेर पडतील असेही शिवसेना खासदार संजय राऊत यांनी म्हटलं आहे. दरम्यान, आता ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल यांनीही महाराष्ट्रातील बिनविरोध पायंड्यावर सडकून प्रहार केला आहे. त्यांनी ट्विट करत आपली निवडणूक व्यवस्था संकटात सापडत चालली असल्याचे म्हटलं आहे.



**महाराष्ट्रातील बिनविरोध पायंड्यावर कपिल सिब्बलांचा सडकून प्रहार**

पैशाची ताकद आणि राजकीय दबाव यावरच आता निवडणूक निकाल

कपिल सिब्बल यांनी ट्विट करत म्हटलं आहे की, भाजप आणि शिंदे गटाच्या शिवसेनेचे उमेदवार महाराष्ट्रातील ६९ पैकी ६८ जागांवरती बिनविरोध निवडून आले आहेत ही अत्यंत गंभीर बाब आहे. आपली निवडणूक व्यवस्था संकटामध्ये सापडत झाली आहे. पैशाची ताकद आणि राजकीय दबाव यावरच आता निवडणूक निकाल ठरत असल्याचे चित्र दिसत आहे. याबाबत निवडणूक आयोगाला काहीच चिंता नाही का? अशी विचारणा त्यांनी केली आहे.

दरम्यान, बिनविरोध निवडणूक पायंड्यावर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनीही आज मुंबईसाठी वचननामा जारी करताना हल्लाबोल केला. उद्धव ठाकरे यांनी राहुल नार्वेकर यांच्या दमदाटीवरून राजीनाम्याची मागणी केली. बिनविरोध झालेल्या जागांवरही त्यांनी निवडणूक घेण्याची मागणी केली आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी भाजपवर हल्लाबोल करताना पश्चिम बंगालची आठवण करून दिली. राज्यकर्त्यांकडून आपण करत असलेल्या कृतीने चुकीचे पायंडे पाडत नाही आहोत ना, याचे भान सुटता कामा नये, असे म्हटले.

## आम्ही सगळे फॉर्म परत घेतो तुम्हीच जिंका अशा निवडणुका? ; सोलापुरातील हत्याप्रकरणावरुन अमित ठाकरेंचा संताप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या दिवशी सोलापुरात मनसे पदाधिकाऱ्याची हत्या घडल्याचा धक्कादायक प्रकार घडला. या हत्याकांडानंतर राजकीय सोलापुरातील वर्तुळातूनही स्थानिक भाजप नेत्यांवर टीका होत आहे. विशेष म्हणजे, उमेदवारी अर्ज माघारी घेऊन निवडणूक बिनविरोध करण्यासाठी झालेल्या खटाटोपातून हा प्रकार घडल्याने सर्वत्र संताप व्यक्त होत आहे. मनसेचे नेते अमित ठाकरे यांनी आज सोलापुरात मृत मनसे पदाधिकारी बाळासाहेब सरवदे यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले. यावेळी, घडल्या प्रकाराबाबत मत व्यक्त करताना त्यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आवाहन केलं आहे. तसेच, आपण मुख्यमंत्र्यांना भेटणार असून राज ठाकरे यांच्याही कानावर ही घटना घातल्याचं त्यांनी म्हटलं.

महापालिका निवडणुकांमध्ये पैसे देऊन फॉर्म परत घेण्यापर्यंत ठीक होतं. मात्र, उमेदवारी मागे घेण्यावरुन आता खून करू लागले आहेत. समोरच्या पक्षातल्या लीडरकडे देखील मुलं-मुली आहेत, मी जसं बघितलं तसं एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस यांनी बघावं, असे म्हणत अमित ठाकरे यांनी सोलापुरातील घटनेवरुन संताप व्यक्त केला. अशा निवडणुका असतील तर नको आम्हाला निवडणुका, आम्ही सगळे फॉर्म परत घेतो तुम्हीच जिंका अशा निवडणुका? महाराष्ट्राची ही परिस्थिती आणून ठेवलीय तुम्ही, अशा शब्दात संताप व्यक्त केला. कधी कोणीही वारल्यावर मी राजकारण करत नाही, आज देखील सांत्वन करायला आलो आहे. तुमचं राज्य कुठे नेऊन ठेवलंय हे तुम्हाला कधी कळणार आहे की नाही? आपल्या सगळ्यातला माणूस जागा झाला पाहिजे आणि ह्या गोष्टींचा विचार केला पाहिजे. देवेंद्र फडणवीस यांना माझी विनंती एक दिवस प्रचार सोडा आणि इथे या, निवडणुका कोणत्या पातळीला नेऊन ठेवल्या आहेत हे तुम्हाला कळेल. फडणवीस राज्याचे मुख्यमंत्री आहेत, आपलं राज्य कुठे चाललं आहे त्यांनी पाहिलं पाहिजे, असेही अमित ठाकरे यांनी मुख्यमंत्र्यांना उद्देशून म्हटले. तसेच, एक आई, दोन मुली आज अस्थिविसर्जन करून आले आहेत, ही कोणती परिस्थिती आहे? या सर्व प्रश्नांची उत्तरे मिळाली पाहिजे, बाळासाहेबांना न्याय मिळाला पाहिजे, असेही अमित ठाकरेंनी म्हटले. फडणवीस यांनी मुख्यमंत्री म्हणून दहा मिनिटे वेळ मला द्यावी, मी सर्व विषय त्यांच्यासमोर मांडेन. सोलापूरकर म्हणून विचार केला पाहिजे, कुठे नेऊन ठेवतोय आपलं शहर? असेही अमित ठाकरे यांनी म्हटले. तर, मुलींच्या शिक्षणाचा सगळा खर्च मी करणार, मी इथे आर्थिक विषयावर काही बोलणार नाही, राज साहेबांनी मुख्यमंत्री यांच्याशी बोलणं केलं आहे, अशी माहितीही अमित यांनी यावेळी दिली.

### प्रियकराने ही केला आत्महत्येचा प्रयत्न; प्रकृती नाजूक

## अक्कलकोटमध्ये २२ वर्षीय स्नेहा बनसोडे या तरुणीची प्रेमप्रकरणातून गळा चिरून हत्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

महेश गायकवाड/अक्कलकोट : अक्कलकोटमध्ये २२ वर्षीय स्नेहा श्रीकांत बनसोडे या तरुणीची तिचा प्रियकर आदित्य रमेश चव्हाण याने प्रेमप्रकरणातून गळा चिरून हत्या केली आहे. ही घटना आज रविवार दिनांक ४ जानेवारी २६ रोजी दुपारी १२ वाजण्याच्या जवळपास येथील लोखंडे मंगल कार्यालयाच्या जवळ असलेल्या कोळी यांच्या बंगल्यात घडली आहे. प्रियकर आदित्य रमेश चव्हाण वय २४, वर्षे रा. नागूर तांडा मैंदर्गी अक्कलकोट याने ही स्वतःवर ब्लेड ने वार करून नसा कापून घेत आत्म हत्येचा प्रयत्न केला असून त्याची प्रकृती अत्यंत नाजूक अशी आहे. सद्या त्यास सोलापूर येथील सिव्हिल हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. या खून प्रकरणी मुलीची आई लक्ष्मी श्रीकांत बनसोडे वय ४०. रा. १८६/६८ पोगुल मळा रामवाडी सोलापूर यांनी उत्तर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. प्रियकर मुलाविरुद्ध गुन्हा रजिस्ट र नंबर भाग ५ गुन्हा नंबर ५/२६ अन्वये खून आणि इतर कलमा खाली गुन्हा दाखल केला असून पुढील तपास डी वाय एस पी विलास यामावार हे करीत आहेत.



प्रेमप्रकरणातून हा खुनाचा प्रकार घडला आहे. आरोपीने मुलीस गेल्या वर्षभरापासून प्रेमाच्या जाळ्यात ओढून तिला वारंवार अक्कलकोट येथील कोळी यांच्या बंगल्यात असलेल्या लॉज मध्ये घेऊन येत असल्याची माहिती उघड झाली आहे.

अक्कलकोट शहरात आज दुपारी खुनाची धक्कादायक घटना घडल्या नंतर अक्कलकोट मध्ये मोठी खळबळ उडाली होती. सोलापूर येथील २२ वर्षीय तरुणी स्नेहा श्रीकांत बनसोडे हिची हत्या झाल्याचे उघडकीस झाले आहे. स्नेहा श्रीकांत बनसोडे (वय २२, रा. रामवाडी, सोलापूर) असे मृत तरुणीचे नाव आहे.

स्नेहल ही सध्या शिक्षणासाठी आपल्या आजोळी, मामाकडे मैंदर्गी येथे वास्तव्यास होती. आरोपी आदित्य चव्हाण या युवकासोबत ती अक्कलकोट येथील कोळी यांच्या बंगल्यात लॉजमध्ये थांबली होती. आज दुपारी दोघांमध्ये झालेल्या वादानंतर आरोपी युवकाने लॉजच्या खोलीत स्नेहाचा ब्लेड ने गळा चिरून खून आणि स्नेहा रक्ताच्या थारोळ्यात पडल्या नंतर त्याने स्वतः वर ही ब्लेड ने वार करून आत्महत्येचा प्रयत्न केला. यात तो गंभीर जखमी झाला असून त्याची प्रकृती गंभीर आहे.

घटनेनंतर आरोपी युवक - आदित्य चव्हाण (रा. नागुर तांडा, ता. अक्कलकोट) - याने स्वतःवर धारदार शस्त्राने गंभीर वार करून आत्महत्येचा प्रयत्न केल्या नंतर जखमी अवस्थेत त्याला तातडीने सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे.

घटनेची माहिती मिळताच अक्कलकोट उत्तर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दीपक भिताडे यांच्या सह उप विभागीय पोलिस अधिकारी विलास यामावार व इतर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. आणि मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला असून कोळी यांच्या लॉजमधील सीसीटीव्ही फुटेज, कॉल डिटेल्स आणि इतर पुरावे तपासले जात आहेत. या प्रकरणी डी वाय एस पी विलास यामावार हे पुढील तपास करीत आहेत.

या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून तरुणीच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

## माजी नगरसेविकेच्या पतीसह ११ आरोपींना ८ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापुरातील मनसे पदाधिकारी बाळासाहेब सरवदे यांच्या हत्या प्रकरणातील ११ आरोपींना चार दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. माजी नगरसेविका शालन शिंदे यांचे पती शंकर शिंदेसह ११ आरोपींना ही पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. राजकीय वादातून मनसे पदाधिकारी बाळासाहेब सरवदे यांची शुक्रवारी संध्याकाळी हत्या झाली होती. या हत्या प्रकरणात एकूण १५ आरोपीवर पोलिसांनी गुन्हे नोंदवले होते.



**बाळासाहेब सरवदे हत्या प्रकरण!**

माजी नगरसेविका शालन शिंदेसह चार आरोपीना या आधीच पोलिसांनी अटक केली असून ते पोलीस कोठडीत आहेत. उर्वरित ११ आरोपीना पोलिसांना आज अटक करून न्यायालयात हजर केलं असता त्याना ८ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

सोलापुरातील जोशी गल्ली, रविवार पेठ परिसरात निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर झालेल्या वादातून मनसे विद्यार्थी शहर प्रमुख बाळासाहेब पांडुरंग सरवदे याची तलवार व कोयत्याने वार करून निर्घृण हत्या केल्या प्रकरणी फरार आरोपी १) विशाल शंकर शिंदे २)सुनील शंकर शिंदे ३) राहुल राजू सरवदे ४) ईश्वर सिद्धेश्वर शिंदे ५) रोहित राजू सरवदे ६) महेश शिवाजी भोसले ७) शंकर बाबू शिंदे ८) अनिल शंकर शिंदे ९) शारदा तानाजी शिंदे १०) आलोक तानाजी शिंदे ११) विशाल ऊर्फ दादू संजय दोरकर यांना जेलरोड पोलीस ठाण्याचे पोलिसांनी अटक केली आहे.

याबाबत मृत बाळासाहेब सरवदे यांचे भाऊ बाजीराव पांडुरंग सरवदे (वय २५, रा. जोशी गल्ली, रविवार पेठ) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आरोपींनी निवडणुकीत उभे राहू नये म्हणून धमकी दिली होती. अपक्ष अर्ज मागे घ्या, नाहीतर तुम्हाला जिवंत सोडणार नाही, अशी उघड धमकी देण्यात आल्याचा आरोप आहे. दिनांक २ जानेवारी रोजी दुपारी १ ते सायंकाळी ४.४५ च्या दरम्यान हनुमान मंदिराजवळ आरोपींनी वाद घालून बाळासाहेब सरवदे यांच्या डोळ्यांत चटणी टाकून त्यांना काहीही दिसू नये अशी स्थिती निर्माण केली. त्यानंतर काही आरोपींनी त्यांचे हात पकडले, तर काही आरोपींनी तलवार व कोयत्याने छातीवर वार करून त्यांना गंभीर जखमी केले उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी जेल रोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या घटनेप्रकरणी काल दिनांक ३ जानेवारी रोजी अमर शंकर शिंदे, शालन शंकर शिंदे, अतिश शंकर शिंदे, तानाजी बापू शिंदे या चार आरोपींना अटक करण्यात आली होती ते सध्या पोलीस कोठडीत आहेत. उर्वरित वर नमूद सर्व आरोपींना आज अटक करण्यात आली होती आणि त्यांना आज रोजी मे. न्यायालयात हजर केले होते. यात आरोपी तर्फे ॲड. संतोष न्हावकर, ॲड. राहुल रूपनर यांनी तर सरकार पक्षातर्फे ॲड.ज्योती वाघमारे यांनी काम पाहिले.

## संपादकीय....

# धडाकेबाज कारवाई

राज्यात बंदी असलेल्या सुंगधित तंबाखू आणि हुक्का उत्पादन करत कायद्याचे कोणी उल्लंघन करताना आढळल्यास त्याच्यावर अशाच प्रकारे कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्र्यांनी दिला आहे. जळगाव जामोद महाराष्ट्र-मध्यप्रदेश सीमेवरील सातपुडा पर्वताच्या पायथ्याशी असलेल्या वनविभागाच्या तपासणी नाक्यावर वनविभागाने सप्तर्कतेने मोठी कारवाई करत मध्यप्रदेशातून महाराष्ट्रात अवैधरित्या आणला जाणारा तब्बल ७५ लाख रुपये, किमतीचा विमल गुटखा व पान मसाला जप्त केला. महाराष्ट्र शासनाने मानवी आरोग्यास घातक ठरणाऱ्या सुगंधी तंबाखू आणि हुक्क्यावर बंदी घातली असतानाही, त्याचा मोठा साठा दडवून ठेवणाऱ्या 'मे. हायस्ट्रीट इम्पेक्स एलएलपी' या गोदामावर अन्न व औषध प्रशासनाने ३० डिसेंबर २०२५ रोजी छापा टाकला आहे. भिवंडीतील दापोडे परिसरातून तब्बल १९ कोटी ४५ लाख ७६ हजार ३२० रुपये किमतीचा प्रतिबंधित हुक्का साठा जप्त करण्यात आला आहे. १ डिसेंबर रोजी घेण्यात आलेल्या 'अफजल' ब्रँडच्या हुक्का नमुन्यांच्या तपासणी अहवालात निकोटिनचे प्रमाण आढळल्याने ही कारवाई करण्यात आली. हा पदार्थ मानवी सेवनासाठी अपायकारक असल्याचे अन्न विश्लेषकांनी घोषित केले होते. राज्यात प्रतिबंधित वस्तूंवर कारवाईसाठी कठोर आदेश दिल्यानंतर आणि त्याची काटेकोर अंमलबजावणी होत आहे की नाही याचा आढावा घेतला जात असल्याने अन्न व औषध प्रशासन विभागाने राज्यभर प्रतिबंधित वस्तूंच्या उत्पादना विरोधात कारवाईचा बडगा उगारला आहे. याच कारवाई अंतर्गत पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील टाकवे येथील 'मे. सोएक्स इंडिया प्रा. ली.' या कंपनीवर छापा टाकून अन्न व औषध प्रशासनाने तब्बल ३१ कोटी ६७ लाख २१ हजार ९८७ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी कंपनीचे संचालक आणि व्यवस्थापकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, ही कारवाई २ जानेवारी २०२६ रोजी करण्यात आली. यापूर्वी १ डिसेंबर २०२५ रोजी या कंपनीच्या उत्पादनांचे नमुने तपासणीसाठी घेण्यात आले होते. मुंबईतील अन्न विश्लेषकांच्या अहवालानुसार, या नमुन्यांमध्ये 'निकोटिन' पॉझिटिव्ह आढळले. हे उत्पादन मानवी आरोग्यास घातक असून महाराष्ट्र सरकारने १६ जुलै २०२५ रोजी काढलेल्या प्रतिबंधात्मक आदेशाचे उल्लंघन करणारे असल्याचे स्पष्ट झाले. एकूण किंमत ३१ कोटी ६७ लाख,२१,९८७ रुपये (३१.६७ कोटी)रुपयांचे विविध फ्लेवर्सचे तयार हुक्का प्रॉडक्ट्स, कच्चे पदार्थ आणि फ्लेवर्सचा साठा जप्त करून कंपनीच्या दारांना सील ठोकले आहे.

# गावाच्या ओढीने भरलेली, आपुलकीची अनपेक्षित भेट



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

आजचा रविवार मनाला नकळत सुखावून गेला. मराठीबोली दिवाळी अंक स्पर्धेच्या निमित्ताने नवी पेठेतील पत्रकार भवन येथे कार्यक्रम होता. नेहमीप्रमाणे माझी हमसफर सायकल घेऊन आझाद नगर, वानवडी येथून निघालो. दुपारची वेळ, रस्त्यांवरची गडबड आणि मनात कार्यक्रमाची उत्सुकता–अशा अवस्थेत पत्रकार भवनासमोर सायकल लावून आत जात असतानाच समोर दिसले ते गावाकडचे, जीवाभाचे माणूस

गोंगावचे उपसरपंच, सामाजिक कार्यकर्ते कमालकर सोनकांबळे!

क्षणभर विश्वासच बसेना. पुण्यासारख्या मोठ्या शहरात, तेही अशा कार्यक्रमाच्या ठिकाणी, गावातला आपला माणूस अचानक समोर येणं–या क्षणाने मन अक्षरशः भरून आलं. आनंदाने गळाभेट झाली. त्या क्षणी गाव, माती, माणसं सगळंच डोळ्यांसमोर उभं राहिलं.

थोड्याच वेळात गोंगावचेच सुपुत्र, पुण्यात कर्तृत्वाने आपली ओळख निर्माण केलेले चंद्रकांत गुंजोटी आणि गंगाधर जिरगे यांचीही भेट झाली. मग काय

गावाकडच्या गप्पांना सुरुवात झाली. ग्रामपंचायतीच्या आठवणी, अनुभव, निवडणुका, येणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांवर चर्चा, बदलती राजकीय समीकरणं–सगळं काही मनसोक्त बोलणं सुरू झालं. शहराच्या धावपळीत हरवलेली ती गावठी आपुलकी पुन्हा एकदा अनुभवायला मिळाली.

या गप्पांमध्ये माझ्या सायकलप्रेमाचाही विषय निघाला. सायकलवरून येणं–जाणं, त्यामागचं वेड आणि विचार–याबद्दल सर्वांनी मनापासून कौतुक केलं. अशा छोट्या गोष्टींमधूनही माणसांमधली आपुलकी किती सुंदरपणे व्यक्त होते, याची जाणीव झाली.

तेवढ्यात अक्कलकोट तालुक्यातील किरनळ्ळी गावचे सुपुत्र आणि पुण्यात आपल्या कर्तृत्वाने वेगळं विश्व निर्माण करणारे, लोकशाही न्यूजचे प्रमुख पत्रकार मित्र चंद्रशेखर भांगे गप्पांमध्ये सामील झाले.

भांगे जी म्हणजे खऱ्या अर्थाने तळागाळातून आलेले, हाडाचे पत्रकार. टी.व्ही. मीडियामध्ये आज महत्त्वाची भूमिका बजावत असलेले, आणि अक्कलकोट तालुक्याचा अभिमान असलेले एकमेव नाव. त्यांच्या अनुभवांनी आणि स्पष्ट विचारांनी गप्पांना आणखीच खोली मिळाली.

क्षणात सुरू झालेली ही भेट, कधी संपली कळलंच नाही.

गावाकडच्या माणसांची ऊब, आठवणींचा ओलावा आणि मनमोकळ्या गप्पांचा हा अनमोल क्षण मनात कायमचा कोरला गेला.

खरंच,

गावाकडचं माणूस अचानक भेटलं की शहरही थोडंसं आपलं वाटू लागतं

**– धोंडपा नंदे**

**गावगाथा, संपादक पुणे**

# तालुकास्तरीय किशोरी मेळाव्यात वर्षा बिराजदार हिचे यश



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही (बालिका दिन )तालुकास्तरीय किशोरी हितगुज मेळाव्याचे आयोजन जेऊर येथे केले होते यामध्ये तालुक्यातील किशोरींचा सहभाग असून तालुकास्तरावर विविध स्पर्धांचे आयोजन केले होते यामध्ये जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा उमरगे येथील नवोपक्रमशील विद्यार्थीप्रिय शिक्षिका श्रीमती रिंकू अनंतराव जाधवर यांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता सातवीच्या वर्गातील वर्षा बिराजदार हिने पोस्टर्स स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मिळवला तर रंगभरण या स्पर्धेमध्ये द्वितीय क्रमांक मिळविला याप्रसंगी तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी श्री अरबाळे साहेब विस्तार अधिकारी श्री स्वामी साहेब व मैंदर्गी केंद्राचे केंद्रप्रमुख श्री महादेव पाटील साहेब यांच्या उपस्थितीत सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले .याप्रसंगी सर्व बालिका व अन्य मान्यवर उपस्थित होते .

# प्रभाग क्रमांक १२३ मध्ये भाजप शिवसेना रिपाई महायुतीचे उमेदवार अनिल भाई निर्मळे यांची प्रचारात जोरदार आघाडी ; नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/केतन भोज : प्रभाग क्रमांक १२३ चे भाजप शिवसेना रिपाई महायुतीचे अधिकृत उमेदवार अनिल भाई निर्मळे यांची संपूर्ण प्रभागात आमदार राम कदम यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच भाजप महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांसोबत जोरदार प्रचार फेरी सुरू असून,याला प्रभागातील नागरिकांचा विशेषतः तरुणाईचा मोठ्या प्रमाणावर उत्स्फूर्त प्रतिसाद पाठिंबा मिळत आहे.तसेच प्रभाग क्रमांक १२३ मध्ये अनिल भाई निर्मळे यांची प्रचार फेरीत आणि प्रचारात ही जोरदार आघाडी बघायला मिळत आहे.या प्रचार फेरी दरम्यान अनिल भाई निर्मळे हे प्रभागातील नागरिक तसेच प्रभागातील व्यापारी वर्गाशी संवाद साधत प्रभागाच्या विकासाविषयी चर्चा करत आहेत. तसेच यावेळी प्रभागातील स्थानिक नागरिकांनी ही या प्रचार फेरीला उत्स्फूर्त प्रतिसाद देत अनिल भाई निर्मळे यांचे स्वागत केले.



प्रभाग क्रमांक १२३ चे भाजप शिवसेना रिपाई महायुतीचे उमेदवार अनिल भाई निर्मळे यांनी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली प्रभाग क्रमांक १२३ मध्ये विकासाभिमुख,पारदर्शक आणि लोकाभिमुख प्रशासन देण्याचा निर्धार व्यक्त केला.प्रभाग क्रमांक १२३ चा सर्वांगीण विकास,नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांचे वेळेत निराकरण आणि सुशासन हेच आपले प्रमुख उद्दिष्ट असल्याचे यावेळी अनिल भाई निर्मळे यांनी सांगितले.

या प्रचार फेरीत भाजप महायुतीचे उमेदवार अनिल भाई निर्मळे यांच्या सोबत मंडळ अध्यक्ष – संतोष गांजले,शिवसेना समन्वयक – मंगेश मोहिते,भाजप १२३ चे वॉर्ड अध्यक्ष – महेश गुप्ता,प्रभाग क्रमांक १२३ चे शिवसेनेचे शाखाप्रमुख – सुनील सोडा,महिला शाखाप्रमुख – पूजा पवार हे देखील उपस्थित असताना दिसत आहेत.

# दरोडा टाकण्याचे तयारीत असणारे आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेने केले गजाआड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधी / सुधाकर रणदिवे : मा. पोलीस अधिक्षक श्रीमती. रितु खोखर, अपर पोलीस अधिक्षक श्रीमती. शफकत आमना यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. विनोद इज्जपवार यांचे आदेशाने पोलीस ठाणे येरमाळा व कळंब हददीत हायवेवरून जाणारे वाहनांची आडवुन लुटमार होण्याचे प्रमाण वाढल्याने स्थानिक गुन्हे शाखेचे पथक रात्रगस्त पेट्रोलिंग करीत असताना कळंब ते केज जाणारे रोडचे बाजुस कळंब शहरातील व्दारकानगरीचे जवळ बंद असलेल्या पेट्रोलपंपामध्ये दोन पिकअप वाहन व काही इसम थांबलेले दिसले पथकाचे वाहनास पाहुन काही इसम तेथुन पळण्याचे तयारीत असताना त्यांना पथकातील पोलीस अंमलदार यांनी जागेवरच पकडले. त्या सर्वांना ताब्यात घेवुन त्यांचेकडे तेथे थांबण्याचे कारण व नावाबाबत विचारपुस केली असता त्यांनी सुरवातीस उडवा उडवीचे उत्तरे दिली त्यांना अधिक विश्वासात घेवुन त्यांचेकडे विचारपुस केली असता त्यांनी त्यांची नावे

१) चंदर भास्कर काळे सुभाष ऊर्फ हरी भास्कर काळे शामसुंदर बिभीषण काळे रा. कन्हेरवाडी पाटी ता. कळंब नवनाथ अनिल शिंदे राहुल अनिल शिंदे रा.लक्ष्मी पारधी पिढी तेरखेडा ता. वाशी बालाजी माणिक काळे शिराढोण दत्ता हिरा पवार रा.लोहटा पुर्व ता. कळंब असे सांगीतले त्यांनी सांगीतलेले नावाबाबत पथकास संशय वाटल्याने त्यांची माहिती घेतली असता त्यांचेवर गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असल्याचे दिसले त्यांचेवर जास्त संशय वाढल्याने पथकाने पंचासमक्ष



सदर दोन पिकप वाहनाची पाहणी केली असता आतमध्ये दरोडा टाकण्याचे साहित्य एक लोखंडी धारदार तलवार, एक स्टील चा रॉड, ०४ मोबाईल मिळुन आले पिकअप वाहनासह एकुण १०,८९,०००/– रू.चा मुददेमाल जप्त करुन नमुद आरोपी विरूध्द पोलीस ठाणे कळंब येथे गुरनं ०४/२०२६ कलम ३१०(४),३१०(५) बीएनएस सह कलम ४२५ शस्त्र अधिनियम प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. नमुद आरोपीतांचे अभिलेखाची पाहणी केली असता त्यांचेवर दरोडा, जबरी चोरी, वाहन चोरी असे मालाविषयी चे गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले.

# डिकसळ पं.स. गणातून आनंद बोराडे यांना भाजपाकडून उमेदवारीची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधि/ सुधाकर रणदिवे : आगामी होऊ घातलेल्या जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीसाठी डिकसळ पंचायत समिती मतदार संघातून ग्रा.पं सदस्य सामाजिक कार्यकर्ते आनंद बोराडे यांना उमेदवारी देण्यात यावी अशी मागणी डिकसळ ग्रामस्थांचा वतीने होत आहे .



अधिक वृत्त असे की लवकरच होऊ घातलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकीचे सूप वाजणार आहे त्या दृष्टीने सर्वच पक्षाकडून प्रत्येक मतदारसंघात उमेदवारीची चाचपणी निरीक्षका कडून केली जात आहे त्याच धर्तीवर डीकसळ पंचायत समिती गटातून ग्रामपंचायत सदस्य आनंद बोराडे यांना उमेदवारी भाजपाकडून देण्यात यावी यासाठी डिकसळ व परिसरातील नागरिकांकडून होत आहे कारण आनंद बोराडे हा सर्वसामान्य कार्यकर्ता असून नागरिकांचा दैनंदिन कामासाठी रात्रंदिवस पळणारा साधा माणूस असल्याचे डिकसळ वाशियांचे मत असल्याचे बोलले जात आहे.

# सांगोल्यात कायदा व सुव्यवस्था भंग करणाऱ्यांची चौकशी करा; पोलिस निरीक्षकांना दिले शेकापकडून विविध मागण्यांचे निवेदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सांगोला : आमदार डॉ. बाबासाहेव देशमुख व त्यांच्या कुटुंबाची बदनामी केल्याबाबत शेकाप कडून पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांना निवेदन देण्यात आले. या षडयंत्रामध्ये अनेक राजकीय नेत्यांचा सहभाग असून या षडयंत्रामधील सर्वांची नावे जनतेसमोर येणे आवश्यक आहेत. तालुक्यातील कायदा व सुव्यवस्था भंग करणाऱ्या या सुनियोजित षडयंत्राची सखोल चौकशी करण्याची मागणी शेकाप कडून करण्यात आली असल्याची माहिती चिटणीस दादासाहेब बाबर यांनी दिली.





सांगोला विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ बाबासाहेब देशमुख यांना साधारण १५ दिवसांपूर्वी जेष्ठ नेते श्री नारायण जगताप हे त्यांच्या कार्यालयात भेटण्यासाठी गेले होते. त्यावेळेस आमदारसाहेबांनी त्यांना सांगितले होते की आपला मुलगा दादा जगताप हा माझी व माझ्या कुटुंबाची सतत वैयक्तिक बदनामी करतो आहे. आतापर्यंत खूप वेळा मी स्वतः व पक्षातील इतर जोर मंडळींनी दादा ला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला आहे मात्र त्याचे बदनामी करण्याचे प्रयत्न चालूच आहेत. नाइलाजास्तव आज त्याचे वडिल म्हणून मी हे तुमच्या कानावर घालतोय. तुम्ही त्याला समजावून सांगा त्यावेळेस श्री नारायण जगताप यांनी मुलाला समजावून सांगतो म्हणाले व इथून पुढे असे काही होणार नाही असे सांगितले.

दि.२९/१२/२५ रोजी आमदार साहेब नेहमीप्रमाणे आपल्या कार्यालयात काम करत असताना पुन्हा एकदा दादा जगताप यांनी आमदार साहेबांवरती व त्यांच्या कुटुंबावरती बदनामीकारक भाष्य केले व ते सोशल मिडीयावरती व्हायरल करण्याची धमकी दिली. याचे कारण विचारण्याकरिता आमदार डॉ .बाबासाहेब देशमुख हे श्री नारायण जगताप यांच्या घरी गेले व त्यांना सर्व परिस्थिती समजावून सांगितली व मुलाला समज द्यावी अशी विनंती केली. यानंतर आमदार डॉ .बाबासाहेब देशमुख मुंबई ला त्यांच्या पूर्वनियोजित कामांसाठी निघून गेले. यानंतर श्री नारायण जगताप यांनी डॉ. अनिकेत देशमुख यांना बोलावून घेतले व आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या वरती बदनामी कारक व राजकीय हेतूने प्रेरित दोन समाजात तेढ निर्माण करण्याचे षडयंत्र रचले. या षडयंत्रामध्ये तालुक्यातील अनेक राजकीय नेत्यांचा सहभाग असून या षडयंत्रामधील सर्वांची नावे समोर येणे आवश्यक असून, तालुक्यातील कायदा व सुव्यवस्था भंग करणाऱ्या या सुनियोजित षडयंत्राची सखोल चौकशी करून सदरच्या कटात कोण कोण सहभागी आहेत याची नावे उघड होणे आवश्यक आहे.

सदरच्या षडयंत्रातील सूत्रधारांवर लवकरात लवकर कारवाई करण्यात यावी ही विनंती. सदरच्या प्रकरणातील सूत्रधारांवर लवकर कारवाई करण्यात आली नाही तर मतदारसंघात निर्माण होणाऱ्या कायदा व सुव्यवस्थाला सर्वस्वी आपण जबाबदार असाल. असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

निवेदन देते प्रसंगी समाधान पाटील, माणिक वाघमारे,नंदकुमार शिंदे, समाधान पवार,आबासाहेब बाबर,मुकेश काशीद,आबासाहेब बंडगर,कल्याण भोसले,नंदकुमार यादव,दत्ता जाधव,सोमनाथ शिंदे,नरेश बनसोडे,अमजद बागवान, शिवाजी शेजाळ, हेमंत शिंदे,आबासाहेब मोटे, नवनाथ शिंगाडे,आकाश व्हटे, सूरज लवटे, यांच्यासह शेकापचे असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# अलका गणेश भगत यांचा धडाकेबाज प्रचार ; नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/ केतन भोज : प्रभाग क्रमांक १२७ च्या भाजप शिवसेना रिपाई महायुतीच्या अधिकृत उमेदवार सौ.अलका गणेश भगत यांची संपूर्ण प्रभागात आमदार राम कदम यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच भाजप महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांसोबत जोरदार प्रचार फेरी सुरू असून,याला प्रभागातील नागरिकांचा मोठ्या प्रमाणावर उत्स्फूर्त प्रतिसाद पाठिंबा मिळत आहे.तसेच प्रभाग क्रमांक १२७ मध्ये सौ.अलका गणेश भगत यांची प्रचार फेरीत आणि प्रचारात ही जोरदार आघाडी बघायला मिळत असून,धडाकेबाज प्रचार पहायला मिळत आहे.या प्रचार फेरी दरम्यान सौ.अलका गणेश भगत या प्रभागातील नागरिकांशी त्यांच्या घरोघरी जाऊन संवाद साधत प्रभागाच्या विकासाविषयी चर्चा करत आहेत.तसेच यावेळी प्रभागातील स्थानिक नागरिकांनी ही या प्रचार फेरीला उत्स्फूर्त प्रतिसाद देत सौ.अलका गणेश भगत यांचे स्वागत केले.

प्रभाग क्रमांक १२७ च्या भाजप शिवसेना रिपाई महायुतीच्या उमेदवार सौ.अलका गणेश भगत यांनी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली प्रभाग क्रमांक १२७ मध्ये विकासाभिमुख,पारदर्शक आणि लोकाभिमुख प्रशासन देण्याचा निर्धार व्यक्त केला.प्रभाग क्रमांक १२७ चा सर्वांगीण विकास,नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांचे वेळेत निराकरण आणि सुशासन हेच आपले प्रमुख उद्दिष्ट असल्याचे यावेळी सौ.अलका गणेश भगत यांनी सांगितले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# पडघा येथिल महामार्गावरील धोकादायक आठवडा बाजार

## रस्त्याच्या कडेला नागरिकांची गर्दी; अपघात झाल्यास जबाबदार कोण ? निवेदन देऊन देखिल स्थानिक प्रशासनाचे दुर्लक्ष?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील पडघा आठवडा बाजारात मोठया प्रमाणात नागरिकांची गर्दी होत असून शेरेकरपाडा, नाशिक महामार्गाच्या कडेलाच हा आठवडा बाजार भरत असून, खरेदी करण्यासाठी आलेले नागरिक रस्त्यावरच पार्किंग करत आहेत. रस्त्याच्या कडेला बसलेले सुकी मासळी व्यावसायिक तर आदी व्यावसायिक ठाण मांडून बसल्यामुळे पडघा, नाशिक महामार्गावर रविवारी आठवडा बाजारात मोठ्या प्रमाणावर गर्दी पाहायला मिळत असून महाम ार्गावरील भरधाव वाहनाचा





ताबा सुटल्यास गर्दीत वाहन घुसुन मोठा अपघात घडण्याची शक्यता असल्याची स्थानिक नागरिकांकडून वर्तवली जात आहे. बाजारातील सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. तर या गंभीर प्रश्नाकडे पडघा ग्रामपंचायत आणि पोलिस प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याने नागरिक नाराजी व्यक्त करत आहेत.

याचे गांभीर्य लक्षात घेत पडघा ग्रामपंचायत हद्दीतील मुंबई नाशिक महामार्गा लगत भरणारा आठवडा बाजार बंद करण्याची मागणी वाहुली गाव विकास प्रतिष्ठान समाजसे‐ वी संस्थेच्या वतीने ही गर्दी धोकेदायक असुन महाम ार्गावरील बाब वाहुली गाव विकास प्रतिष्ठान( रजि.) या समाजसेवी संस्थेच्या लक्षात येताच संस्थेचे अध्यक्ष सुरेश शिंदे, सहसचिव गणेश मते यांनी सदर बाजार बंद करण्याची मागणी एप्रिल मध्ये सरपंच ग्रामपंचायत पडघा, तहसी‐ लदार भिवंडी, पोलीस निरीक्षक पडघा पोलीस ठाणे यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली होती. तर भादाणे ग्रामपंचायत सदस्य महेश वावरे यांनी पडघा ग्रामपंचायत कार्यालयात काही महिन्यांपूर्वी लेखी निवेदन दिले होते. त्याबाबत वृत्तपत्रात बातमी प्रसिद्ध होताच पडघा ग्रामपंचायतीच्या वतीने व्यवसायिकांना समज देऊन ग्राम पंचायतीतर्फे कारवाईचे फलक लावले होते. मात्र काही महिने उलटून कारवाईला न जुमानता आठवडा बाजार पुन्हा महाम ार्गाच्या कडेला पुन्हा मोठ्या प्रमाणात भरत असून ,भरधाव वाहनाचा ताबा सुटल्यास गर्दीत वाहन घुसुन मोठा अपघात घडण्याची शक्यता असल्याची स्थानिक नागरिकांकडून वर्तवली जात असून, याबाबत सद्या चिंता व्यक्त केले जात आहे. मात्र सद्या ही जैसे थे परिस्थिती रविवारच्या आठवड्या बाजारात शेरेकरपाडा येथे दिसून येते. तर आठवडे बाजारातील विक्रेत्यांना पर्यायी व्यवस्था करून देण्याची मागणी होत आहे. या म ागणीला पर्याय निघेल का? याकडे वाहुली गाव विकास प्रतिष्ठान समाज‐ सेवी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचे तसेच पडघे परिसरातील नागरिकांचे याकडे लक्ष वेधले आहे. तर रविवारच्या बाजारातील सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. त्यामुळे पडघा ग्रामपंचायत व पोलिस प्रशासनाने संयुक्तपणे योग्य नियोजन करून गर्दीच्या वेळी शेरेकरपाडा, नाशिक महाम ार्गावर काहीतरी मार्ग काढावा अशी मागणी होत आहे.

> **हायवे लगत जी दुकाने लावली जातात त्या करीता ग्रामपंचायत आणि पडघा पोलीस यांच्या मार्फत संयुक्तिक सूचना देण्यात आल्या आहेत परंतु ती लोकं ग्रामपंचायतीचं ऐकत नाहीत. नॅशनल हायवे प्रशासनाने त्यांच्यावर कारवाई करणे गरजेचं आहे.**
>
> **– पडघा पंचायत अधिकारी, भास्कर घुडे**

# कल्याणशेट्टी महाविद्यालयाचे वागदरी येथे होणार राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष श्रमसंस्कार शिबिर वागदरी येथे सोमवार दिनांक ५ जा‐ नेवारी ते रविवार दिनांक ११ जानेवारी पर्यंत होणार आहे.

विशेष श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष आम दार सचिन दादा कल्याणशेट्टी करणार असून यावेळी अक्कलकोट नगरपरिषदेचे मुख्याधिकारी रमाकांत डाके विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत, याशिवाय संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, सचिव मल्लिकार्जुन मसूती, पंकज सुतार, राजेंद्र बंदीछोडे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान सरपंच शिवानंद घोळ‐ सगाव हे भूषविणार आहेत.


सात दिवसाच्या शिबिरात श्रम दान, वृक्षारोपण, परिसर स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, जनजागृती रॅलीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. शिबिरामध्ये दि.६ जानेवारी दु.३ वा. जलसंधारण व्यवस्थापन विषयावर कृषी सहाय्यक आनंद कांबळे हे व्याख्यान देणार आहेत, राजशेखर निंबाळे अध्यक्षस्थान भूषवणार आ‐ हेत. दि. ७ जानेवारी दु.३ वा. म हिलांच्या जीवनातील बदलते स्वरूप आव्हाने व उपाय यावर परिसंवाद होणार आहे या परिसंवादात मैंदर्गी नगर परिषदेच्या नुतन नगरसेविका सुरेखा होळीकट्टी, पुनम कोकळगी, रूपाली शहा सहभागी होणार आ‐ हेत, सौ शांभवीताई कल्याणशेट्टी परिसंवादाचे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. तर दि. ८ जानेवारी दु.३ वा. शाश्वत विकासाच्या दिशेने युवकांची भूमिका या विषयावर कृषी अधिकारी सुशील पाटील विचार व्यक्त करणार आहेत. यावेळी शांतेश्वर कोठे उप‐ स्थित राहणार आहेत. याशिवाय ग्रामीण रुग्णालय वागदरी यांच्या विद्यमाने मुला‐ मुलींची रक्तगट तप‐ ासणी होणार आहे. तसेच दि. ९ जा‐ नेवारी दु.३ वा. भारुड, सांस्कृतिक कार्यक्रम, आदींचे आयोजन करण्यात आले आहे.

दि. ११ जानेवारी स.१० वा. या शिबिराच्या समारोपासाठी अक्कलकोट नगरपरिषदेचे नूतन नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. शिवानंद घोळसगाव, प्रदीप पाटील, बापूराव चव्हाण हे देखील या कार्यक्रमासाठी उपस्थित राहणार आहेत. दरम्यान काळात शिबिर कार्याची पाहणी करण्यासाठी प्र कुलगुरू डॉ लक्ष्मीकांत दामा, डॉ राजेंद्र वडजे, डॉ विरभद्र दंडे हे सदिच्छा भेट देणार आहेत.

श्रमसंस्कार शिबिर यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ एस आर लोखंडे, कार्यक्रमाधिकारी प्रा राजशेखर पवार, प्रा डॉ शितल झिंगाडे भस्मे प्रयत्न करत आहेत.

# जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस सज्ज, सोलापूर जिल्ह्यातील निरीक्षकासह सनिरीक्षक नियुक्ती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : संपूर्ण राज्यामध्ये जिल्हा परिषद आणि पंचायत समितीचे वारे वाहू लागले आ‐ हेत. अशाच सोल‐ ापूर जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या वतीने जिल्हा परिषदेत आणि पंचायत समितीवर झेंडा फडकवण्याच्या दृष्टीने जोरद‐ ार जोरदार हालचाली सुरू केले आहे. सुरुवातीचा पहिला टप्पा म्हणून जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्या मध्ये निरीक्षकासह सहनिरीक्षकाच्या नियुक्ती करण्यात आले आहेत.

राज्याची माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी सोलापूर जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची अकलूज येथील शिवरत्न बंगला येथे बैठक संपन्न झाली यावेळी जिल्ह्यातील सर्व प्रमुख पदाधिकारी यांनी आमदार उपस्थित होते. तुझ्या बैठकीनंतर माढा लोकसभा मतदारसंघाचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष वसंतराव देशमुख, सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस सर चंद्र पवार पक्षाचे कार्याध्यक्ष रवींद्र पाटील यांच्या स्व‐ ाक्षरीने जिल्ह्यातील आमदारांनी प्रम ुख पदाधिकाऱ्यांच्या निरीक्षक आणि सहनिरीक्षक पदी नियुक्ती करण्यात आल्या असल्याचे अधिकृत पत्र देण्यात आले आहे.

या करण्यात आलेल्या नियुक्तीम ध्ये अक्कलकोट आणि दक्षिण सोलापूर या तालुक्यासाठी निरीक्षक पदी राज्याची माजी मंत्री प्राध्यापक लक्ष्मणराव ढोबळे सर, सांगोल्याची निरीक्षक पदी आमदार नारायण आबा पाटील, मंगळा तालुका निरीक्षक पदी आम दार उत्तमराव जानकर, उत्तर सोलापूर साठी मोहोळचे आमदार राजू खरे, तर बार्शी पंढरपूरसाठी माळ्याचे आम दार अभिजीत पाटील यांची निरीक्षक पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

विविध तालुक्यातील निरीक्षक यांना सहकार्य करण्यासाठी सहनिरीक्षकांची ही नियुक्ती करण्यात आली आहे यामध्ये सोलापूरचे जिल्हाध्यक्ष वसंतराव देशमुख आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उद्योग व व्यापार विभागाचे प्रदेशाध्यक्ष नागेश दादा फाटे या दोघांची पंढरपूर आणि बार्शी तालुक्यासाठी नियुक्ती करण्यात आली आहे सुरज देशम ुख व सौ विनंती कुलकर्णी यांची सांगोला तालुक्याच्या सहनिरीक्षक पदी नियुक्ती करण्यात आली आहे. मंगळवेढा तालुक्यातील धनंजय साठे आणि शंकरराव बागल तर दक्षिण सोलापूर आणि अक्कलकोट साठी सागर पडवळ आणि अरुणा तोडकर यांची सहनिरीक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे तर उत्तर सोलापूर साठी रविंद्र पाटील आणि रणजीत चौरे अशी नियुक्ती करण्यात आली आ‐ हेत त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस शरचने पवार पक्षाची वेगळी तयारी सुरू झाली असल्याचे दिसून येत आहे.

# करमाळा तालुक्यातून नूतन पोस्ट ऑफिस कार्यालयाची उद्घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : करम ाळा तालुक्यातील नूतन पोस्ट कार्यालयाचे उद्घाटन माढा लोकसभा म तदारसंघाचे खा‐ सदार धैर्यशील म ोहिते पाटील यांच्या पाठपुराव्यामुळे माढा लोकसभा म तदारसंघात २१ नवीन पोस्ट ऑफिस मंजूर करण्यात आले आहेत.

पैकी करमाळा तालुक्यातील आळजापूर व हिवरे येथील नूतन मंजूर झालेले पोस्ट ऑफिस चे उद्घाटन खासदार दैनिक मोहिते पाटील व आमदार नारायण आबा पाटील यांच्या शुभहस्ते प्रमुख उप‐ स्थितीत संपन्न झाले.

याप्रसंगी पंढरपूर डाक विभाग अधीक्षक मुन्ना कुमार, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाची तालुकाध्यक्ष अम रजीत साळुंखे, जिल्हा सरचिटणीस संतोष वारे भरतरीनाथ अभंग आद‐ ळापूरचे सरपंच संजय रेडे, हिवरे चे सरपंच दत्तात्रय घाडगे, उपसरपंच अतुल फरतडे, हरिश्चंद्र पाटील, आदिनाथ चे संचालक डॉ. अमोल घाडगे देवानंद बागल उपस्थित होते.

यावेळी खासदार दहशत मोहिते पाटील यांनी गावात नव्याने सुरू झालेल्या पोस्ट ऑफिसच्या बुकिंग कुरिअर विमा सुरक्षा व इतर सेवांचा लाभ घ्यावा अशी सांगितल्याने पोस्टाच्या सेवेबाबत ग्राम स्थांना विश्वास दिला.

यावेळी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी बाळासो पवार अँड प्रशांत बागल, शिवाजी पाटील, सुदर्शन तळेकर, आबासाहेब टापरे हनुमंत पाटील, मोहन पाटील मच्छिंद्र रोडे, शिवाजी जाधव अम ोल जाधव नानासाहेब मगर विजय वीटकुळे व इतर मान्यवर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तालुका लेदरबॉल क्रिकेट स्पर्धेत अद्वैत जाधव ठरला सामनावीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुका क्रिकेट असोशियन आयोजित लेदरबॉल क्रिकेट स्पर्धे त समतानगर येथिल अद्वैत अमोल जाधव सामनावीर ठरला आहे. लेट कमल लोहिया इंटर स्कूल आणि १६ वर्षांखालील क्लब क्रिकेट स्पर्धा २०२५‐२६ आयोजन भिवंडीतील बी. एन. एन महाविद्यालयातील मैदानावर नुकतेच आयोजित करण्यात आल्या होत्या. या तालुका क्रिकेट स्पर्धेत पडघा ,समतानगर येथिल कु. अद्वैत अमोल जाधव याने गोलंदाज म्हणून उत्कृष्ट गोलंदाजी करून ४ षटकात १ षटक निर्धाव टाकून फक्त १९ धावा दिल्या. व ५ फलंदाज बाद केले. त्याच्या उत्कृष्ट खेळीमुळे कु. अद्वैत अमोल जाधव सामनावीर ठरला आहे.सामनावीर ठरलेल्या अद्वैत जाधव याला मेडल व ज्या लेदर चेंडूने पाच फलंदाज बाद केले तो चेंडू देऊन त्याला गौरविण्यात आले आहे. एक वर्षा पूर्वीच भारतातील वाय.एस.सी.एल. या यंग स्टार्स क्रिकेट लीग मध्ये (१४ वयोगट) या वयोगटात महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करून राष्ट्रीय स्तरावर निवड करण्यात आली होती. दिल्ली, नोएडा येथे राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेत अद्वैत जाधव याने उत्कृष्ट कामगिरी केली होती. तर पुन्हा एकदा भिवंडी तालुका क्रिकेट असोशियन आयोजित क्रिकेट स्पर्धेत अद्वैत अमोल जाधव ने उत्तम कामगिरी केली आहे. सदर क्रिकेट स्पर्धेसाठी भिवंडी तालुका क्रिकेट असोसेशन , अस‐ ोसेशट मुंबई क्रिकेट असोसेशन तर्फे हुसेन सरगुरू, उमरहुसेन सरगुरू , अजय जयस्वाल, कृष्णा केशरवाणी यांचे मार्गदर्शन लाभले. अद्वैत जाधव यांच्या उत्तम कामगिरी बद्दल टी. ए .पाटील इंग्लिश मीडियम स्कूल पडघा, लोकधारा प्रतिष्ठान, समाज विकास मंडळ समतानगर, संयुक्त जयंती महोत्सव कमिटी पडघे विभाग यांनी अभिनंदन केले असून, विविध स्तरावर अद्वेत जाधव याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



# खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्या हस्ते शिर्डीत दैनिक समर्थ गांवकरी वाढदिवस विशेष अंकाचे प्रकाशन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

शिर्डी/प्रतिनिधी : शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्या वाढदिवसानिमि त्त दैनिक समर्थ गांवकरीने प्रकाशित केलेल्या वाढदिवस विशेष अंकाचे प्रकाशन आज शिर्डी येथे आयोजित अभिष्टचिंतन सोहळ्यात त्यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.

या विशेष प्रसंगी खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्या हस्ते दैनिक समर्थ गांवकरी च्या वाढदिवस विशेष अंकाचे प्रकाशन करण्यात आले. हा क्षण उपस्थित कार्यकर्ते, पत्रकार व नागरिकांसाठी उत्साहवर्धक ठरला.

या कार्यक्रमास शिवसेना शिर्डी शहर संघटक अमोल गायके, ऋतिक पगारे, रोहित जाधव तसेच शिर्डी शहर प्रतिनिधी राहुल फुंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. उप‐ स्थित मान्यवरांनी खासदार वाकचौरे यांच्या सामाजिक, विकासाभिमुख कार्याचा गौरव करत त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

अभिष्टचिंतन सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

**आमदार अभिजीत पाटील यांचे प्रतिपादन**

# चव्हाणवाडीत विकासाला गती! 'ज्योतिबा मंदिराचा सभामंडप श्रद्धा-सुविधेचा संगम ठरेल'

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी : चव्हाणवाडी (टेंभुर्णी) येथील नांगरे वस्तीतील प्रसिद्ध ज्योतिबा मंदिराच्या नवीन सभामंडपाच्या उभारणीस आज अधिकृत सुरुवात झाली. आमदार निधीतून मंजूर झालेल्या १० लाख रुपयांच्या कामाचे विधिवत भूमिपूजन म ाढा तालुक्याचे आमदार अभिजीत पाटील यांच्या हस्ते उत्साहात पार पडले.

या प्रसंगी देवस्थानच्या वतीने आमदार अभिजीत पाटील यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. त्यांच्यासमवेत उपस्थित राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुरज देशमुख, माजी सरपंच प्रमोद कुटे तसेच डी.व्ही.पी. बँकेचे चेअरमन औदुंबर देशमुख यांचाही देवस्थानच्या वतीने सत्कार करण्यात आला.

भूमिपूजनप्रसंगी बोलताना आमदार अभिजीत पाटील यांनी भावनिक शब्दांत सांगितले की, ज्योतिबा मंदिर परिसरात



उभारला जाणारा हा सभामंडप केवळ बांधकाम नसून श्रद्धा, सुविधा आणि सामाजिक एकोपा यांचे प्रतीक ठरेल. या सभामंडपामुळे महिला व ज्येष्ठ नागरिकांना देवदर्शनासाठी बसण्याची उत्तम व सुरक्षित सोय उपलब्ध होणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी त्यांनी चव्हाणवाडी गावा‐ तील स्मशानभूमीचा प्रश्न गांभीर्याने घेत असल्याचे स्पष्ट करत, हा प्रश्न येत्या दोन‐तीन महिन्यांत निश्चितपणे मार्गी लावला जाईल, असे ठाम आश्वासन ग्रामस्थांना दिले. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि प्रत्येक नागरिकाच्या अडचणी सोडवण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचेही त्यांनी ठासून सांगितले.

सदर कार्यक्रमादरम्यान नवनाथ शिंदे यांनी नव्याने खरेदी केलेल्या जेसीबी मशी‐ नची पूजा आमदार अभिजीत पाटील यांच्या हस्ते करण्यात आली.

गावातील ऊस उत्पादक शेतकरी व सभासदांना उद्दे‐ शून बोलताना आमदार पाटील म्हणाले की, साखर कारखाने सुरू होऊन ५० ते ५५ दिवस झाले असून पुढील किमान तीन महिने गाळप हंगाम सुरू राहणार आहे. त्यामुळे कोणत्याही शेतकऱ्याने घाबरून जाऊ नये. या गा‐ वातील शेतकऱ्यांचा एक टिपर ऊसही शिल्लक राहणार नाही, असे ठाम आश्वासन त्यांनी दिले.

या कार्यक्रमास राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुरज देशमुख, डी. व्ही.पी. बँकेचे चेअरमन औदुंबर देशम ुख, माजी सरपंच प्रमोद कुटे, अरुण चव्हाण, माजी सरपंच नवनाथ शिंदे, सुभाष इंदलकर, माजी सरपंच भागवत खडके, नागेश माळी, अनिल नांगरे, विजय कदम, जमाल काझी, सुधीर पाटील, नितीन चव्हाण (वायरमन), सुधीर नांगरे, मंगेश इंदलकर, शशिकांत नांगरे, युवराज मिस्किन, श्याम नांगरे, ज्योतीराम शिंदे, सचिन शिंदे, सागर चव्हाण, विष्णू महालिंगडे, सोमनाथ गायकवाड (वरवडे), संदीप कुटे, दत्त‐ ात्रय गायकवाड, निलेश पवार, गणेश नांगरे, नितीन नांगरे यांच्यासह ग्रामस्थ म ोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मनोज नांगरे यांनी केले, तर आभारप्रदर्शन सुधीर नांगरे यांनी मानले.

# भीमा कोरेगाव येथे शौर्यदिनानिमित्त मानवंदना देण्यासाठी आलेल्या अनुयायांना अन्नदान वाटप

## अक्कलकोट तालुका पुणे रहिवाशी संघ पुणे यांचा स्तुत्य उपक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे/प्रतिनिधी : अक्कलकोट तालुका पुणे रहिवाशी संघ पुणे यांच्या वतीने एक जानेवारी भीमा कोरेगाव येथे शौर्यदिनानिमित्त म ानवंदना देण्यासाठी आलेल्या २५ ते ३० हजार अनुयायांना अन्नदान, पाणी वाटप, बिस्किटे वाटप ,ज्यूस वाटप, तसेच आरोग्य शिबिर आणि आपत्कालीन परिस्थितीम ध्ये ॲम्बुलन्सची सेवा देण्यात आली. अक्कलकोट तालुका पुणे रहिवासी संघाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. राहुल रुही यांच्या संकल्पनेतून सेवेचे हे दुसरे वर्ष असून अक्कलकोट तालुक्याच्या वतीने इतक्या मोठ्या प्रमाणात अन्नदान करण्याचे पहिलेच वेळ असून राज्यभरातून आलेल्या अनुयायाने समाधान व्यक्त करून या उपक्रमाचे कौतुक केले आहे.



यावेळी हृदयविकारात झटका आलेल्या एका रुग्णाचे प्राण देखील अक्कलकोट तालुका रहिवासी संघाच्या वतीने अजित शिबिरातील डॉक्टरांनी वाचून म्बुलन्स उपलब्ध करून त्याला हॉस्पिटल नेण्याची व्यवस्था केली पीएमटी प्रशासन, पोलीस अधिकारी ,कर्मचारी यांना देखील नियोजनासाठी वाहतूक व्यवस्थे साठी लाऊड स्पीकरच्या माध्यमातून अक्कलकोट तालुका रविवाशी संघाने सहकार्य केले त्यामुळे प्रशासन, बार्टी, सम ाजकल्याण विभाग,यांनी देखील अक्कलकोट तालुका पुणे रहिवासी संघाच्या या कार्याचे कौतुक केले आहे.

हा हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थापक अध्यक्ष प्रा. राहुल रुही , अध्यक्ष राम सोनकांबळे , सचिव चंद्रकांत शिंगे बनसोडे, उपाध्यक्ष दशरथ मडीखांबे, राम हाले, रहिवासी संघाचे कायदेशीर सल्लागार अँड विजयकुमार बनसोडे,अविनाश गायकवाड, कार्याध्यक्ष युवा व्याख्याते सागर सोनकांबळे, बसवराज आलमेल , अँड.महादेव चिकळी अजित गायकवाड,रम ेश वटार ,तुकाराम पोटे ,शरण शिंगे, अविनाश शिंगे, श्रीकांत मडीखांबे , वैद्यकीय सेवेसाठी डॉ.सुनील गायकवाड आणि टीम , म्ब्युलन्स सेवेसाठी अविनाश थोरे, नागेश तळकेरी , सल्लागार विश्वनाथ शिंदे, अनिल शिंदे, नितीन बनसोडे, मुदकु तळकेरी , गौतम बनसोडे, मलकाप्पा तळकेरी , मुतप्पा , भोगेश सोबान,बाबुराव



बनसोडे, काशिनाथ बनसोडे, रोहित पंडित, सागर भारत सोनकांबळे आदी शेकडो पदाधिकारी सदस्य यांनी परिश्रम घेतले

# सोलापूर महानगरपालिका निवडणूक : भयमुक्त वातावरणात मतदान होण्यासाठी महाविकास आघाडीचे पोलिस आयुक्तांना निवेदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर महानगरपालिका सार्वजनिक निवडणूक प्रक्रिया सध्या सुरू असून सर्व राजकीय पक्ष निवडणुकीत सहभागी झाले आहेत. सोलापूर शहरात नेहमीच कोणतीही कटुता न आणता खेळीमेळीच्या वाता-वरणात निवडणुका लढविण्याची सुसंस्कृत परंपरा राहिली आहे. मात्र, सत्तेच्या बळावर भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांकडून या परंपरेला काळिमा फासला जात असल्याचा गंभीर आरोप महाविकास आघाडीच्या नेत्यांनी केला आहे.



काल घडलेल्या खूनी हत्येच्या घटनेतून भाजप कार्यकर्त्यांची गुंड प्रवृत्ती उघड झाली असून, निवडणूक काळात प्रत्येक प्रभागात दमदाटी करणे, उमेदवारांवर उमेदवारी मागे घेण्यासाठी दबाव आणणे, मारहाण करणे तसेच विविध प्रकारे दहशत निर्माण करणे हे प्रकार सर्रास सुरू असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे सोलापूर शहरात विरोधी पक्षांच्या कार्यकर्त्यांना भयमुक्त वातावरणात फिरणे व प्रचार करणे अवघड झाले आहे.

या पार्श्वभूमीवर सोलापूर शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवून निवडणूक प्रक्रिया पारदर्शक आणि भयमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी पोलिस प्रशासनाने योग्य ती दक्षता घ्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच भाजप कार्यकर्त्यांकडून मनसेच्या पदाधिकाऱ्याची झालेल्या हत्येप्रकरणी खुनाचा सूत्रधार व मारेकरी यांच्यातील मोबाईल संवादाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी ठाम म ागणीही करण्यात आली आहे.

यासंदर्भात महाविकास आघाडीच्या वतीने सोलापूर पोलिस आयुक्तालयात पोलिस आयुक्त एम. राजकुमार यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी खासदार प्रणिती शिंदे, माजी आमदार नरसय्या आडम मास्तर, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष महेश गादेकर, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) जिल्हाध्यक्ष अजय दासरी, शिवसेना उपनेत्या अस्मिता गायकवाड, अशोक निंबर्गी, भारत जाधव, युसुफ मेजर, प्रताप चव्हाण, तिरूपती परकीपंडला, अँड केशव इंगळे आदी उपस्थित होते.

तसेच खासदार प्रणिती शिंदे आणि महाविकास आघाडीच्या नेतेमंडळींनी खुनी हल्ल्यात मृत्युम ुखी पडलेल्या बाळासाहेब सरवदे यांच्या निवासस्थानी भेट देऊन कुटुंबीयांचे सांत्वन केले.

# जि प शाळा तांदुळवाडी येथे सावित्री जिजाऊ महोत्सवाचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब: प्रतिनिधि/ सुधाकर रणदिवे : तालुक्यातील मौजे तांदूळवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या जयंती पासून ते राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या जयंती पर्यंत शाळेत सावित्री-जिजाऊ महोत्सवाचे आयोजन केले आहे.



सांस्कृतिक कार्य विभागाच्या प्रमुख श्रीमती आशा पवार यांच्या नेतृत्वात शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये विविध स्पर्धा आणि गुणात्मक बाबीचे संवर्धन व्हावे यासाठी सावित्रीमाई यांच्या जयंती पासून ते राजमाता, राष्ट्रमाता जिजाऊंच्या जयंती पर्यंत रोज वेगवेगळ्या स्पर्धा घेण्यात येणार आहेत यामध्ये वेशभूषा वक्तृत्व गायन वादन स्मरणशक्ती सामान्य ज्ञान सुंदर हस्ताक्षर इत्यादी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून स्पर्धेमधील विजेत्यांना प्रजासत्ताक दिनी मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात येणार आहे या कार्यक्रमासाठी शाळे-तील मुख्याध्यापकासह सर्व शिक्षकांनी सहभाग नोंदविला आहे कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी मुख्याध्यापक श्री संतोष भोजने, सह शिक्षक श्री संतोष मोहिते सर, श्री सयाजी शिंदे सर व श्रीमती रसिका आगरकर या परिश्रम घेत आहेत.

# सावित्रीबाई फुले व पंचप्पा कल्याणशेट्टी यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : देशभरातील मुलींच्या शिक्षणाची पायाभरणी करून शिक्षणाची द्वारे सर्व जाती धर्मातील म ुलींना प्रतिकूल स्थितीत खुली करणाऱ्या पहिल्या महिला शिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचे स्म रण म्हणून तसेच सीमावर्ती भागातील मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे महान कार्य स्व. पंचप्पा कल्याणशेट्टी यांनी केले ही भावना मनोभावे उद्दीपित करून कल्याणशेट्टी महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी खास त्यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम आयोजित केला.



कल्याणशेट्टी महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी सावित्रीबाई फुले व पंचप्पा कल्याणशेट्टी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला.

इतिहास व राज्यशास्त्र अभ्यास मंडळातील विद्यार्थिनींनी एकत्र येऊन सावित्रीबाई फुले व पंचप्पा कल्याणशेट्टी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. याप्रसंगी प्रा डॉ बाळासाहेब पाटील, प्रा मधुबाला लोणारी, प्रा विद्या बिराजदार, प्रा ओमकार घिवारे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे नियोजन प्रा सौरभ भस्मे यांनी केले प्रास्ताविक शकुंतला कोरे यांनी केले तर आभार पायल कांबळे यांनी मानले.

**कल्याणशेट्टी महाविद्यालयातील इतिहास व राज्यशास्त्र अभ्यास मंडळातील विद्यार्थिनींचा उपक्रम**

या उपक्रमाचे संस्थेचे अध्यक्ष आम दार सचिनदादा कल्याणशेट्टी, संचालिका शांभवीताई कल्याणशेट्टी, ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, सचिव मल्लिकार्जुन मसुती, प्राचार्य डॉ एस आर लोखंडे, जूनियर विभागप्रमुख पुनम कोकळगी, सेमी इंग्लिश विभाग प्रमुख रूपाली शहा, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी यांनी कौतुक केले.

# आदर्श केंद्रप्रमुख व विस्तार अधिकारी पुरस्कार कार्यक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सोलापूर जिल्हा स्काऊट गाईड यांच्यावतीने सारे येथील जिल्हा मेळाव्यात आदर्श केंद्रप्रमुख व विस्तार अधिकारी पुरस्कार कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा शिक्षण अधिकारी कादर शेख, डायट प्राचार्य नदाफ सर, प्राचार्य हनुमंत चव्हाण, तहसीलदार गणेश जगद-ाळे, बार्शी गटशिक्षणाधिकारी बाल-ाजी नाटके, पंढरपूर गटशिक्षणाधिकारी मारुती लिगाडे, स्काऊट गाईड जिल्हा समन्वयक श्रीधर मोरे, शिरसाट मॅडम उपस्थित होते व करमाळा तालुका पंचायत समिती शिक्षण विभागाचे स्काऊट गाईड कब बुलबुल पथक नोंदणी शंभर टक्के केल्याबद्दल झरे केंद्रप्रमुख अमृता सोनवणे, जातेगाव केंद्रप्रमुख रमाकांत गडफळ, चिकलठाण केंद्रप्रमुख वंदना पांडव, जिद्दी केंद्रप्रमुख महावीर गोरे कंदर केंद्रप्रमुख साईनाथ देवकर चित्तूर केंद्रप्रमुख विकास काळे यांना आपल्या केंद्रातील सर्व शाळांची स्काऊट गाईड व कब बुलबुल पथकाची १००% नोंदणी केल्याबद्दल कोर्टी बीटचे विस्तार अधिकारी प्रभावत जगताप यांना आदर्श विस्तार अधिकारी म्हणून विस्तार शिक्षण अधिकारी यांनी बार्शी येथील जिल्हा मेळाव्यात आदर्श केंद्रप्रम ुख व आदर्श विस्तार अधिकारी म्हणून जिल्हास्तरीय पुरस्कार देऊन गौरवण्यात आले यावेळी पंचायत समिती शिक्षण विभागाचे गटशिक्षणाधिकारी नितीन कदम, विस्तार अधिकारी मिनीनाथ टकले, जयवंत नलावडे तालुका सम न्वयक संतोष पोतदार यांनी अभिनंदन केले आहे.




# ग्रामीण भागाचाच कलावंत रंगभूमीचा खरा नट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बाराभाटी/प्रतिनिधी : मानव जन्मला म्हणजे तो समाजाचा पाईक असतो. वेगवेगळ्या क्षेत्रात पायाभरणी करण्यासाठी आपले कौशल्य प्राप्त करतो. असा नाट्याचा कलावंत हा आपले अभिनय सादरीकरण करण्यासाठी धडपड करतो. तो कलावंत होतो. अशा पद्धतीने ग्राम ीण भागातील कलावंत हा रंगभूम ीचा खरा नट आहे. असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते प्रभाकर दहिकर यांनी केले. ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

यावेळी रंगमंचावर लायकराम भेंडारकर यांच्या अध्यक्षतेखाली उद्घाटन डॉ. राजेश संग्रामे यांनी करून प्रमुख अतिथी जिल्हा परिषद सदस्य कविता कापगते, माजी उपशिक्षणाधिकारी एस एस संग्रामे, दिलवर रामटेके, अनिल दहिवले, सरपंच पतिराम मेश्राम, धम्मदीप मेश्राम, श्री. कटरे बीट अमलदार,

**प्रभाकर दहिकर ; डोंगरगाव येथे नाट्यप्रयोगाचे उद्घाटन**

राजेश लंजे, लैलेश शिवणकर, तामदेव कापगते, शिक्षिका कांबळे, शिक्षिका गीते, प्रशांत कापगते, प्रविण हांडेकर, माजी सरपंच चौधरी आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

प्रसंगी महापुरुषांच्या प्रतिमांना अभिवादन करण्यात आले. खास मंडई निमित्त हनुमान प्रासादिक नाट्य मंडळ डोंगरगाव आयोजित एक डाव वाघिनीचा नाट्यप्रयोग सादर करण्यात आले. प्रसंगी गा-वातील समस्यांचा पाढाच वाचून गावविकासाबद्दल महत्त्वाची भूमि का बजावली आहे. हौशी नाट्य कलावंत गावात उभारुन ही परंपरा अनेक वर्षांपासून जपत आहेत. सोहळ्याचे संचालन धनराज येडाम यांनी केले तर आभार शिशुपाल डोंगरे यांनी मानले. यशस्वीतेसाठी चंद्रभान मेश्राम, वासुदेव येडाम, मानिक औरासे, नाट्य मंडळाच्या सदस्यांनी सहकार्य केले.



## स्वेरीमध्ये ‘क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले’ यांची १९४ वी जयंती साजरी

# क्रांतिज्योती सवित्रीबाई फुले यांच्या विचारांचा जागर आवश्यक : प्रा. सविता दूधभाते

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : ‘भूतकाळातील घटनांचा आढावा व भविष्यकाळाचा वेध घेताना क्रांतीज्योती सावित्रीबाईंच्या विचारांची आज खऱ्या अर्थाने गरज आहे. सावित्रीबाई यांच्याम ुळेच खऱ्या अर्थाने एक स्त्री चूल आणि मुल या चाकोरी बाहेर आली पण त्यापलीकडे माणूस म्हणून पूर्वी स्त्री कडे कोणी पाहत नव्हते आज फुले दांपत्यामुळे स्त्रीला स्वतंत्र ओळख निर्माण झाली. फुले दांपत्यांनी चाकाला शिक्षणाचे आरे फिरवले आणि समाज गतिमान झाला. म्हणून समाज जागृत होण्यासाठी आज क्रांतीज्योती सावित्रीबाई फ ुले यांच्या विचारांचा जागर करणे आवश्यक आहे.’ असे प्रतिपादन पंढरपुरातील उमा महाविद्यालयाच्या बी.एड. विभागाच्या प्रा. सविता दूधभाते यांनी केले.

**सध्या परीक्षेचा कालावधी सुरू असून देखील प्रमुख पाहुण्या प्रा. दूधभाते यांचे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावरील उत्तम विचार ऐकण्यासाठी सर्व विद्यार्थिनी एकरूप झाल्या होत्या.**

गोपाळप-ूर (ता.पंढरपूर) येथील श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूटमध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १९४ व्या जयंती निमित्त प्रमुख पाहुण्या म्हणून प्रा. सविता दूधभाते हया म ार्गदर्शन करत होत्या. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनानंतर वसतिगृहातील विद्यार्थिनी जान्हवी पवार यांनी सावित्रीबाईंच्या जीवनावर सुंदर भाष्य केले. पुढे बोलताना प्रमुख पाहुण्या प्रा. दूधभाते म्हणाल्या की, ‘त्या काळात सावित्रीबाईंनी जो कणखरपणा आणि धाडस, धैर्य, जिद्द, चिकाटी दाखवली तीच आज आपण दाखव-णे आवश्यक आहे. तरच सावित्रीबाईंची जयंती सत्कारणी लागेल. फुले दांपत्यांनी महिलांना शिक्षण हा केंद्रबिंदू मानून संपूर्ण समाजाला नवा विचार, नवी गती देत सामर्थ्य, बुद्धिमत्ता व चातुर्य यांचे महत्व पटवून दिले. शिक्षणाच्या प्रवाहात जात असताना त्यावेळीची स्थिती व आत्ताची स्थिती फारशी वेगळी नाही. त्यावेळी सावित्रीबाई फ ुले ह्या ज्योत बनून कार्य करत राहिल्या म्हणून आज सकारात्म क विचारांच्या माध्यमातून क्रांतीज्योत तेवत ठेवणे शक्य होईल.’ असे सांगून विद्यार्थिनींना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. स्वे-रीचे संस्थापक व कॉलेज ऑफ






इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) चे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांच्या दिशादर्शक मार्गदर्शनाखाली उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. महेश मठपती, प्रा. माणिक देशम ुख, प्रा. संगिता जाधव, डी. फार्मसीचे प्रा. सौरभ कौलगी, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्रा. म हावीर लोखंडे, इतर प्राध्यापक, प्राध्यापिका, वसतिगृहातील जवळपास दोन हजार विद्यार्थिनी व वसतिगृहातील महिला कर्मचारी उपस्थित हो-ते. सूत्रसंचालन सेजल पारगे व सायली शिनगारे या विद्यार्थिनींनी उत्तमरित्या व ओघवत्या शैलीत केले तर वसतिगृह व्यवस्थापक प्रा. आशुतोष गरड यांनी आभार मानले.